निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २३७ वा.
शुक्रवार :३१ ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

### मुक्त विद्यापीठ योग शिक्षणक्रम विद्यार्थिनी

## पुण्याच्या कु. मयुरी शेलारचा विक्रम 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये

**नाशिक प्रतिनिधी/** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या योग शिक्षणक्रमाची विद्यार्थिनी कु. मयुरी विजय शेलार हिने 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये आपले नाव नोंदवले आहे. तिने केवळ ३० सेकंदात ४७ 'चक्रासन पुश-अप्स' करण्याचा विक्रम करून दाखवला आहे.

कु. मयुरी मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील न्यू एज्युकेशन सोसायटी अभ्यास केंद्राची विद्यार्थिनी आहे. तिने याआधी मुक्त विद्यापीठाचा योगशिक्षक पदविका शिक्षणक्रम पूर्ण केला असून सध्या ती विद्यापीठाचाच एम.ए. योग (प्रथम वर्ष) शिक्षणक्रम शिकत आहे. कु. मयुरीने दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी हा पराक्रम केला. ज्यास नुकतीच 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड अचिव्हर' म्हणून मान्यता मिळाली आहे. या विक्रमासाठी तिला न्यू एज्युकेशन सोसायटी अभ्यास केंद्रप्रमुख डॉ. गिरीश धडफळे, योगशिक्षिका श्रीमती सुवर्णा भापकर तसेच सानिका बाम यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'च्या प्रतिनिधी तथा रेकॉर्ड मॅनेजर मानसी सतेजा यांनी या विक्रमाची नोंद केली.




विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, पुणे विभागीय केंद्र संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड व आरोग्य विज्ञान विद्याशाखा संचालिका डॉ. रश्मी रानडे यांनी या विक्रमाबद्दल कु. मयुरी शेलारचे अभिनंदन केले आहे.

आपल्या या यशाबद्दल बोलताना मयुरीने आनंद व्यक्त करत म्हटले की, मुक्त विद्यापीठातून योग डिप्लोमा आणि एम.ए. योग करत असताना मला खूप काही शिकायला मिळत आहे. अभ्यासकेंद्रातील शिक्षक व अधिकारी कर्मचारी यांचे उत्तम सहकार्य लाभले. मी याबद्दल सर्वांची आभारी आहे.

## शासकीय रुग्णालयातील मृत्यूदर कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करा - वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई/** राज्यातील शासकीय रुग्णालयातील मृत्यूदर कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. सेंट जॉर्ज रुग्णालयात मृत्यूदर वाढीची वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांनी गांभीर्याने दखल घेऊन याविषयी तातडीच्या बैठकीचे आयोजन केले. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, संचालक डॉ. अजय चंदनवाले, जे.जे. रुग्णालय आणि सेंट जॉर्ज रुग्णालयाचे अधिष्ठाता आणि वैद्यकीय अधीक्षक आदींसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, शासकीय रुग्णालयातील मृत्यूदर कमी करण्यासाठी रुग्णालयात वैद्यकीय सेवेत तत्काळ सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, निधी आणि उपकरणांची उपलब्धता प्राधान्याने सुनिश्चित करावी. अतीदक्षता विभागातील खाटांची संख्या, मनुष्यबळ वाढविणे, औषधे व आधुनिक उपकरणे पुरविणे आणि दीर्घकालीन सुधारणा आराखडा तयार करण्याचेही त्यांनी निर्देश दिले. अनेक रुग्ण खासगी रुग्णालयातून शेवटच्या टप्प्यात शासकीय रुग्णालयात स्थलांतरित होत असल्यानेही आयसीयूतील मृत्यूदर तुलनेने अधिक दिसत असल्याचे स्पष्ट करण्यात आले असल्याचे मुश्रीफ यांनी सांगितले.

२०२२ ते २०२५ दरम्यान एकूण मृत्यूदरात सातत्याने घट होत आहे. २०२२ मध्ये २०४० रुग्ण तर २०२५ मध्ये ७४०७ रुग्ण यशस्वीरीत्या उपचारानंतर घरी परतले.

यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही करत पारदर्शक चौकशी आणि मजबुत सुधारणा आराखडा आखला आहे. रुग्णालयातील सेवांची गुणवत्ता वाढण्यासाठी ठोस उपाययोजना अमलात आणण्यात येत आहेत.



तत्काळ उपाययोजना

१. 'आयसीयू'मध्ये आवश्यक तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी व महत्त्वाची औषधे तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश

२. अतिगंभीर रुग्णांना आवश्यकतेनुसार सर जे.जे. रुग्णालयात सुसज्ज रुग्णवाहिकेतून स्थलांतर करण्याच्या सूचना

दीर्घकालीन उपाययोजना

१. सेंट जॉर्जेस रुग्णालयात मनुष्यबळ, औषधसाठा आणि आयसीयू बेड्स वाढवण्याचे आदेश

२. मुंबईसह राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा सखोल आढावा घेऊन सेवा गुणवत्ता उंचावणे

३. सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा मृत्यूदराचा मासिक आढावा घेण्याचा निर्णय

४. आवश्यक निधी, मानव संसाधन व औषध पुरवठा शासनातर्फे प्राधान्याने उपलब्ध करून देण्याची हमी यासारख्या उपाययोजना करण्यात येत असल्याची माहितीही वैद्यकीय शिक्षण विभागाने दिली आहे.

## पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जामुळे पशुपालकांच्या उत्पन्न वाढीस हातभार - पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई/** राज्य शासनाने पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार आता वीजदरात सवलतीचा लाभ देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून यामुळे पशुपालकांना वीज दर सवलतीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे ग्रामीण भागातील पशुपालन व्यवसायाला चालना मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस हातभार लागणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

पशुजन्य उत्पादित बाबींस मूल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेती प्रमाणे गट पध्दतीने पशुसंवर्धन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ होईल, पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे वीज आकारणी करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार आता यासंबंधीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. यामुळे पशुपालन व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना वीज दर सवलतीचा लाभ मिळणार आहे. यासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

या शासन निर्णयानुसार खालील अटी पूर्ण करणाऱ्या पशुपालकांना सवलतीचा लाभ दिला जाईल :

पशुधन मर्यादा :

२५,००० पर्यंत मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५०,००० पर्यंत अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी

४५,००० पर्यंत क्षमतेच्या हॅचरी युनिट

१०० पर्यंत दुधाळ जनावरांचा गोठा

५०० पर्यंत मेंढी किंवा शेळी गोठा

२०० पर्यंत वराह (डुक्कर)

सवलतीचा लाभ मिळवण्यासाठी संबंधित पशुपालन प्रकल्पांनी जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांच्याकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पातील सर्व पशुधनाची नोंद एनडीएलएम (भारत पशुधन पोर्टल) वर करावी लागेल. पशुपालन प्रकल्पाकरिता स्वतंत्र वीज मीटर असणेही बंधनकारक आहे. या सवलतीचा वापर पशुगृह, चारा/पशुखाद्य, पाण्याचे पंप, प्रक्रिया व शितसाखळी राखण्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीकरिता करता येईल. मात्र बंद पडलेले प्रकल्प आणि अवसायनातील सहकारी संस्था सवलतीस पात्र ठरणार नाहीत.

सवलत मिळविण्याची कार्यपद्धती

सध्या अस्तित्वात असलेल्या पात्र लाभार्थ्यांचा तपशील संबंधित तालुका पशुसंवर्धन अधिकारी महावितरणला देतील. नवीन लाभार्थ्यांनी वीज जोडणीसाठी ऑनलाईन अथवा ऑफलाईन अर्ज सादर करावा आणि त्याची प्रत सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना द्यावी.



तालुकास्तरावर सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) व उप कार्यकारी अभियंता हे समन्वयक असतील, तर जिल्हास्तरावर उपायुक्त (पशुसंवर्धन) आणि कार्यकारी अभियंता (महावितरण) समन्वय साधतील. पात्र लाभार्थ्यांना वीजदर सवलत देण्यासाठी महावितरण कंपनीने स्वतंत्र तपशील ठेवणे बंधनकारक आहे.

महावितरणकडून सर्व जिल्ह्यांतील पात्र लाभार्थ्यांची माहिती संकलित करून आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय, पुणे मार्फत मुख्य अभियंता (वाणिज्य), महावितरण, मुंबई यांच्याकडे पाठविली जाईल. त्यानंतर ऊर्जा विभागाकडून अर्थसहाय्य मंजूर केले जाईल.

कृषी समकक्ष दर्जा मिळाल्यानंतर वीज दर सवलतीचा लाभ पशुपालकांना देण्याच्या या निर्णयामुळे पशुपालन व्यवसायास स्थैर्य मिळेल, उत्पादन खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळेल, असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

## ऊसतोड कामगारांना डीबीटीद्वारे मदतीचा प्रस्ताव सादर करावा - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**मुंबई/** राज्यात ऊस तोडणीचा हंगाम सुरू झाला असून, अवकाळी पावसामुळे ऊसतोड कामगारांचे हाल होऊ नयेत म्हणून त्यांना तात्काळ मदत मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे ऊसतोड कामगारांना डीबीटी प्रणालीद्वारे आर्थिक मदतीचा प्रस्ताव सहकार विभागाने सादर करावा, अशी सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.



विधानभवनात ऊसतोड कामगारांच्या कल्याणार्थ प्रस्तावित चर्चा व पुढील दिशा ठरविण्याच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, अपर विभागीय आयुक्त कोकण सिद्धराम सालीमठ, उपसचिव अंकुश शिंगाडे, लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र गोरणे, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुण्याचे उपसंचालक डॉ. आशिष भारती उपस्थित होते.

उपसभापती म्हणाल्या डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, ऊसतोड कामगार हे राज्याच्या साखर उद्योगाचे कणा आहेत. अवकाळी पावसामुळे त्यांचे नुकसान होत असून, त्यांच्या अडचणींचा विचार करून तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यामुळे गमबूट, इलेक्ट्रिक कोयता, सॅनिटरी नॅपकिन, ग्लव्हेज या आवश्यक गोष्टी वेळेत मिळण्यासाठी डीबीटीद्वारे मदत देणे सुलभ होईल.त्याचसोबत फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था ग्रामीण विकास विभागामार्फत व संबंधित विभागामार्फत करण्याच्या न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी गरजेची आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

ऊसतोड कामगारांच्या आरोग्य सेवेसाठी त्यांच्या कामाच्या ठिकाणी आठवड्यातून फिरता दवाखाना व महिला कामगारांसाठी स्त्री रोग तज्ज्ञांची देखील सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच महिला ऊसतोड कामगारांसाठी प्रसूती रजा मातृत्व योजनेचा लाभ देण्याबाबतही विचार करण्यात यावा, असेही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.

पुढील बैठकीत ऊसतोड कामगारांच्या कल्याणार्थ चर्चा करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर,सोलापूर, पुणे,कोल्हापूर, धाराशिव,अमरावती, अहिल्यानगर,नाशिक, सातारा, बुलढाणा नांदेड ,लातूर, जळगाव, सातारा, सांगली येथील जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे नियोजन करण्यात येईल, असेही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

## पोलीस चकमकीत जखमी झालेल्या रोहित आर्यचा मृत्यू

**मुंबई/** मुंबईतील पवईतील आरए स्टुडिओमध्ये एका तरुणाने १५ ते २० मुलांना ओलीस ठेवलं. स्टुडिओच्या पहिल्या मजल्यावर अभिनयाचे वर्ग आणि ऑडिशन्स सुरू असताना ही घटना घडली. खिडक्यांमधून मुलांना बाहेर डोकावताना पाहून जवळच्या लोकांमध्ये खळबळ उडाल्याच पाहिला मिळालं. या घटनेनंतर मुंबईत एकच खळबळ माजली आहे. मुंबई पोलिसांच्या सतर्कतेमुळे आरोपी रोहीत आर्यला अटक करण्यात आली होती. दरम्यान रोहित आर्यचा मृत्यू झाल्याची बातमी समोर येत आहे.

**नेमकं काय घडलं?**

मुंबईतील आरए स्टुडिओमध्ये गेल्या चार ते पाच दिवसांपासून मुलांसाठी ऑडिशन्स सुरू होते. युट्यूबर असल्याचा दावा करणारा रोहित आर्य नावाचा तरुण या ऑडिशन्स घेत होता. त्याने आज सकाळी सुमारे १०० मुलांना ऑडिशन्ससाठी बोलवलं होतं. दुपारी १ वाजेपर्यंत त्याने सुमारे ८० मुलांना घरी पाठवलं होतं, तर उर्वरित १७ मुलांना एका खोलीत बंद केलं होतं. जेव्हा मुलं आवाज करू लागली आणि खिडक्यांमधून बाहेर डोकावू लागली तेव्हा लोकांना काहीतरी गडबड असल्याचे जाणवले आणि त्यांनी लगेच पोलिसांना या घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच मुंबई पोलिसांच्या अनेक पथकं घटनास्थळी पोहोचली. स्टुडिओला घेराव घालण्यात आला असून परिसर सील करण्यात आला आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी आरोपीशी संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न केला आहे. मुलांची सुरक्षा ही पहिली प्राथमिकता आहे असे पोलिसांनी माध्यमांना सांगितलं आहे. दरम्यान पोलिसांनी १७ मुलांची सुखरूप सुटका केली आहे. दरम्यान पोलीस चकमकीत जखमी झालेल्या रोहित आर्यचा मृत्यू झालाय.

मुंबई पोलिसांची बाथरुममधून एन्ट्री, १७ मुलांना ओलीस ठेवणाऱ्या रोहीत आर्यकडे नेमकं काय सापडलं?, जाणून घ्या संपूर्ण थरार!

**स्थानिक काय म्हणाले?**

शुटींगच्या नावाने मुलांना ओलीस ठेवण्यास आलं होतं.सर्व मुलांना डांबून ठेवण्यात आलं होतं. गेल्या ६ दिवसांपासून या स्टुडीयोत शूटींग सुरु होतं. घटना घडली तेव्हा मी इथेच होतो. दुपारी मुलं जेवायला बाहेर येतात पण आली नसल्याने भीती वाटली. पोलीस कर्मचारी आणि फायर ब्रिगेडच्या मुलांनी चांगले कार्य केले. पोलिसांनी सर्वच मुलांची सुटका केली अशी माहिती स्थानिकांनी दिली.

**पोलिसांनी आरोपीला कसं पकडलं?**

पवई पोलिसांना पावणे नऊ वाजता फोन आला. पवईत महावीर क्लासेस येथे मुलांना एकाने डांबून ठेवलंय, असं संबंधिताने सांगितलं. आम्ही त्याच्याशी चर्चा केली. मुंबई पोलीसांनी फोर्सचा वापर करुन १७ मुलं आणि १ सिनिअर आणि १ नागरिकाला सुरक्षित आणलं. पोलिसांकडून झालेल्या गोळीबारात आरोपी जखमी झालाय, अशी माहिती डीसीपी दत्ता नलावडेंनी दिली. त्याच नाव रोहित आर्य असे आहे. त्याच्याकडे एअर गन आणि केमिकल्स दिसले. आरोपी एकटाच होता. आणखी त्याच्याकडे काय हत्यार होतं का? हे तपासाअंती समोर आल्याचे नलावडे म्हणाले. आम्ही त्याच्याशी बातचित सुरु केली. तो आपल्या मागण्यांवर ठाम होता. यानंतर पवई पोलिसांनी बाथरुममधून फोर्स एन्ट्री केल्याची माहिती डीसीपी दत्ता नलावडेंनी माहिती. आरोपीचा इतिहास शोधला जाईल. याच्या नक्की मागण्या काय होत्या याबाबत तपास केला जातोय. वेबसिरीजच्या ऑडीशनसाठी त्याने मुलांना बोलावलं होतं. हे ऑपरेशन मुंबई पोलिसांसाठी खूप चॅलेंजिंग होते. आत लहान मुलं होती. त्यांना वाचवणं हे मोठं आव्हान होतं. आमच्या अधिकाऱ्यांनी कार्यवाही करत सर्वांना सुरक्षित बाहेर काढलं.




# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल...

आज ३१ ऑक्टोबर, भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज १५० वी जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. वकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना जातीदिनी विनम्र अभिवादन!

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे पोलादी व धारदार व्यक्तीमत्व...

गुजरात मधील नडियाद येथे ३१ ऑक्टोबर १८७५ ला सरदार वल्लभभाई पटेल नावाचा लोहपुरुष जन्माला आला आणि भारतीय राजकारणात एक पोलादी धारदार व्यक्तीमत्व उदयास आले. कारण त्यांनी देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताला एकसंघीकरण करण्यात मोलाचे योगदान दिले त्यामुळेच त्यांना लोहपुरुष व सरदार ही सर्वोच्च मानाची उपाधी मिळाली. पटेलांनी गुजरातच्या खेडा, आनंद जिल्ह्यातील बोरसद आणि सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यातील संपूर्ण ग्रामवासियांना संघटित करून त्यांनी इंग्रज अत्याचाराच्या विरूद्ध मोठा लढा उभारून सत्याग्रह केला.या सत्याग्रहानंतर प्रभावशाली नेता म्हणून गुजरातसह संपूर्ण भारतात त्यांची गणना होवू लागली.अशा परिस्थितीत त्यांनी मागे फिरून न पहाता एक पाऊल पुढे टाकून स्वतंत्र पुर्वकाळात व स्वातंत्र्योत्तर काळात मोलाची भुमिका बजावली व इंग्रजांशी लोहा घेण्याची शपथ घेतली.आज आपण त्यांच्या कामांचे अनुकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.आपण त्यांची १५० वी जयंती साजरी करीत आहेत.त्यामुळे त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आजचा राजकीय पुढारी देशासाठी काय-काय करू शकतात त्यावर नजर टाकने अत्यंत गरजेचे आहे. कारण वल्लभभाई पटेल यांनी कठोर परिश्रमाने आणि मोठ्या शिताफीने भारत पाकिस्तान फाळणी नंतर उफाळलेल्या हिंसाचारानंतर शांतता स्थापन करण्यासाठी मोठी मोलाची भुमिका बजावली व हिंदुस्थानातील ५६५ अर्धस्वायत्त संस्थानांचे भारतात विलीनीकरण करून घेणे हे भारतासाठी महान आणि मोलाचे कार्य पटेलांनी केले. हे कार्य जोपर्यंत सुर्य-चंद्र,आकाश-पाताळ आहे तोपर्यंत कोणीही विसरणार नाही हेही तितकेच सत्य आहे. त्यांच्यातील मुत्सद्देगिरी, कठोरपणा व वेळ पडल्यास सैन्यबळ वापरून सरदारांनी संस्थाने भारतात विलीन केले आणि म्हणूनच ते भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखले जातात.त्याच्या या महान कार्यामुळे आपण समजू शकतो की भारताची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी त्यांचे किती मोठे मोलाचे योगदान आहे हे दिसून येते.सरदार पटेल यांची कार्यशैली व देशासाठी दिलेले मोलाचे योगदान पहाता महात्मा गांधींनी सरदार वल्लभभाई पटेल यांना लौहपुरूष ही मोठी उपाधी दिली.





त्यांची आठवण निरंतर भारतीयांच्या हृदयात रहावी या उद्देशाने गुजरात मधील नर्मदा येथील सरदार सरोवर बांधच्याजवळ सरदार वल्लभभाई पटेल यांची १८२ मीटर (५९७ फुट) उंच धातुंची प्रतिमा बनवीण्यात आली ही प्रतीमा स्टॅच्यु ऑफ युनिटी म्हणून जगप्रसिद्ध आहे. याठीकानी जगातील अनेक पर्यटक येवून आपली हजेरी लावतात ही देशासाठी मोठी गौरवास्पद बाब आहे.पटेलांनी देशाला एकत्रित बांधण्याकरीता नेहमीच कसोटीचे प्रयत्न केले. त्यामुळे लौहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून संपूर्ण भारतभर साजरी केली जाते. स्वतंत्रपुर्वकाळात प्रत्येक व्यक्ती देशासाठी बलिदान देण्यास तयार होते.त्यांच्यामुळेच आज आपण मोकळा श्वास घेत आहोत.लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करतांना राजकीय पुढारी, प्रशासन, सामाजिक संघटना यांनी त्यांची आठवण म्हणून आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून जयंती साजरी करावी.कारण देशात वाढते बदलते हवामान व प्रदुषण यावर आळा घालण्याचे काम वृक्षलागवडीच्या माध्यमातूनच होवू शकते. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर हि आठवण निरंतर काळापर्यंत राहील व प्रत्येक झाडात,पाणात,फुलात,फळात व मुळांमध्ये आपल्याला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचे अनुकरण होईलच सोबतच दर्शन सुध्दा अवश्य अवगत होईल. सरदार वल्लभभाई पटेलांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन. जय हिंद!

**-लेखक रमेश कृष्णराव लांजेवार (स्वतंत्र पत्रकार ) नागपूर.**

# राष्ट्रीय एकता दिन : राष्ट्रनिर्मितीचा समाजशास्त्रीय पाया

दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी भारतभर 'राष्ट्रीय एकता दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नसून भारताच्या एकात्मतेच्या, अखंडतेच्या आणि राष्ट्रीय भावनेच्या मूळ तत्त्वांचा उत्सव आहे. या दिनाचे औचित्य स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वात दृढ इच्छाशक्तीच्या, दूरदर्शी आणि संघटनशक्तीचे प्रतीक असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीशी संबंधित आहे. 'लोहपुरुष' म्हणून ओळखले जाणारे पटेल यांनी विविध संस्थानांचे विलीनीकरण करून अखंड भारताचा पाया रचला. त्यामुळे राष्ट्रीय एकता दिन हा केवळ एका नेत्याच्या स्मृतीचा नव्हे, तर भारतीय समाजाच्या एकात्मतेच्या तत्त्वांचा प्रतीकात्मक दिवस आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, हा दिवस समाजाच्या ऐक्याची, सामूहिक ओळखीची आणि सामाजिक एकात्मतेची पुन्हा आठवण करून देतो.

भारतीय समाजाची रचना विविधतेने नटलेली आहे. धर्म, जात, भाषा, प्रांतिकता, संस्कृती, वंश या सर्व स्तरांवर असंख्य भेद आहेत. या विविधतेतून एक सशक्त राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे हे केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही मोठे आव्हान होते. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खाइम यांच्या मते, समाजाचे अस्तित्व 'सामाजिक एकात्मते'वर (डेलळरश्र डेश्रळवरीळीूं) अवलंबून असते. ही एकता दोन प्रकारची असते, यांत्रिक आणि सजीव एकता होय. भारतासारख्या विविधतेने भरलेल्या देशात सजीव एकात्मता आवश्यक आहे, जी विविध गटांच्या परस्परावलंबित्वातून आणि सहकार्याच्या भावनेतून निर्माण होते. राष्ट्रीय एकता दिन हे या सजीव एकात्मतेच्या तत्त्वाचे प्रतीक आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतासमोर असलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे विविध प्रांत, भाषा आणि संस्कृती यांना एकत्र आणून 'राष्ट्र' म्हणून एक नवीन सामाजिक ओळख निर्माण करणे. सरदार पटेल यांनी राजकीय पातळीवर ज्या 'संघटन'ची चळवळ चालवली, ती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'सामाजिक एकत्रीकरणा'चे (डेलळरश्र खपींशसीरींळेप) उत्तम उदाहरण आहे. त्यांनी ५६० हून अधिक संस्थानांचे भारतात विलिनीकरण केले, परंतु ही प्रक्रिया केवळ राजकीय नव्हती. ती मानसिक, सांस्कृतिक आणि सामाजिक पातळीवरही लोकांना एका धाग्यात बांधणारी होती.

आजच्या काळात, राष्ट्रीय एकतेची संकल्पना केवळ भौगोलिक अखंडतेपुरती मर्यादित राहिलेली नाही. ती सामाजिक न्याय, समता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि संविधाननिष्ठेच्या मुल्यांवर आधारलेली आहे. भारतीय संविधानाने 'एकता आणि अखंडता' हा राष्ट्राचा मूलभूत उद्देश ठरवला आहे. समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांच्या मते, राष्ट्र हे केवळ राजकीय घटक नसून, सामायिक सांस्कृतिक स्मृती, परंपरा आणि मूल्यांनी बांधलेली सामाजिक रचना असते. म्हणूनच राष्ट्रीय एकता ही सामाजिक संबंधांच्या, सामायिक भावनांच्या आणि सामूहिक स्मृतींच्या जाळ्यावर आधारलेली असते.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक एकात्मतेस नव्या स्वरूपाची आव्हाने आहेत. डिजिटल माध्यमांद्वारे माहितीचा प्रसार जरी वेगाने होत असला तरी त्यातून मतभेद, असहिष्णुता, ध्रुवीकरण आणि विभाजनाच्या प्रवृत्ती वाढत आहेत. अशा वेळी राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य आपल्याला समाजातील तुटकेपणा ओळखून पुन्हा बांधणी करण्याची जबाबदारी स्मरवते. एकतेचा अर्थ सर्वांच्या मतांचे एकसंधीकरण नव्हे, तर विविधतेतून सामंजस्य साधणे हा आहे.

भारतीय समाजशास्त्रात एकतेची संकल्पना 'विविधतेत एकता' (णपळीूं ळप ऊर्ळींशीीळीूं) म्हणून विश्लेषित केली गेली आहे. ही संकल्पना केवळ घोषवाक्य नसून भारतीय सामाजिक जीवनाचा आत्मा आहे. समाजशास्त्रज्ञ जी.एस. घुर्ये, एम.एन. श्रीनिवास आणि आंद्रे बेटे यांनी भारतीय समाजातील परस्परसंवाद आणि परस्परावलंबित्वावर भर देऊन एकतेचा समाजशास्त्रीय पाया स्पष्ट केला आहे. उदा. घुर्ये यांच्या मते भारतीय समाजात जातिभेद असला तरी परस्परपूरकतेचा एक धागा कायम राहिला आहे, ज्यामुळे समाजाचे विघटन झाले नाही. आजही राष्ट्रीय एकतेचा पाया या परस्परपूरक सामाजिक संबंधांमध्ये आहे. राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने आपल्याला हे लक्षात घ्यावे लागते की, राष्ट्र हे केवळ भौगोलिक मर्यादांमधील जनसमूह नव्हे, तर एकत्रित सामूहिक चेतना आहे.

समाजशास्त्रज्ञ अँथनी स्मिथ यांनी ऐींहपे-ीूलेश्रळीा या संकल्पनेत राष्ट्रनिर्मितीत सांस्कृतिक प्रतीकांचे आणि ऐतिहासिक स्मृतींचे महत्त्व स्पष्ट केले आहे. सरदार पटेल यांचे कार्य हे अशाच प्रतीकात्मक राष्ट्रनिर्मितीचे उदाहरण आहे. त्यांनी भारतातील विविध जात, धर्म, भाषिक आणि प्रांतिक समुदायांना एकत्र आणण्यासाठी सांस्कृतिक प्रतीकांचा वापर केला, जसे की अखंड भारताची कल्पना, भारतीय ध्वज, संविधान, आणि सामूहिक राष्ट्रीय ओळख. परंतु आजच्या काळात या एकतेसाठी नव्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. प्रादेशिक अस्मिता, धार्मिक कट्टरता, भाषिक संघर्ष, सामाजिक विषमता आणि आर्थिक असमानता यांमुळे राष्ट्रीय ऐक्याचे सूत्र ढवळून निघत आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे 'सांस्कृतिक विसंवाद' (उीश्रीीरश्र ऊळीीपरपलश) म्हणून समजले जाते. या विसंवादावर मात करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने समानतेची, सहिष्णुतेची आणि बंधुत्वाची भावना आत्मसात करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकता ही केवळ राज्यकर्त्यांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे.

राष्ट्रीय एकता ही आर्थिक, राजकीय आणि सामाजिक स्तरावरही प्रतिबिंबित होते. आर्थिक विषमता वाढल्यास सामाजिक एकात्मता ढासळते, कारण समाजशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांच्या मते, वर्गसंघर्ष हा समाजाच्या तुटकतेचा मूळ घटक आहे. म्हणून राष्ट्रीय एकतेसाठी सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता हे अपरिहार्य घटक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही 'राजकीय लोकशाही'सोबत 'सामाजिक लोकशाही'चे महत्त्व अधोरेखित केले आहे.

ते म्हणतात, राजकीय समता टिकवण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक समता आवश्यक आहे. हीच समता राष्ट्रीय एकतेचा आधार आहे. आजच्या तरुण पिढीसमोर जागतिक पातळीवर स्पर्धा, सांस्कृतिक मिश्रण आणि विचारसरणींचे विविध प्रवाह उभे आहेत. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृतीतील 'विविधतेत एकता' हा मूलमंत्र त्यांना सामाजिक संतुलन राखण्याची प्रेरणा देतो. शिक्षण प्रणाली, माध्यमे, सामाजिक चळवळी आणि नागरिक समाज या सर्व घटकांची भूमिका राष्ट्रीय एकतेला दृढ करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. समाजशास्त्रज्ञ पियरे बुरदिऊ यांच्या 'सांस्कृतिक भांडवल' (उीश्रीीरश्र उरळींरश्र) संकल्पनेनुसार, शिक्षण आणि संस्कृती या सामाजिक एकात्मतेचे महत्त्वाचे साधन आहेत. त्यामुळे शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांनी एकतेची आणि संवेदनशील नागरिकत्वाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवली पाहिजेत. राष्ट्रीय एकता दिन हा केवळ भूतकाळातील योगदानाची आठवण नाही, तर भविष्यातील जबाबदारीची जाणीव आहे. आज सामाजिक माध्यमांवरील ध्रुवीकरण, धार्मिक तणाव आणि ओळखींच्या राजकारणामुळे राष्ट्रीय भावना कमजोर होत आहे. या पार्श्वभूमीवर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून राष्ट्रीय एकतेचा पुनर्विचार आवश्यक आहे. सामाजिक संस्थांचे पुनर्बांधणीकरण, समावेशक धोरणे आणि लोकशाही मूल्यांवरील विश्वास पुनर्स्थापित करणे हे यासाठी आवश्यक आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याचे 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हे केवळ स्मारक नसून भारताच्या अखंडतेचे प्रतीक आहे. ते आपल्याला आठवण करून देते की राष्ट्राची शक्ती भौगोलिक विस्तारात नाही, तर नागरिकांच्या अंतःकरणात आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या ही एकता सामूहिक भावना, सहजीवन आणि परस्पर आदरावर आधारलेली आहे. म्हणूनच राष्ट्रीय एकता दिन आपल्याला भेदभावाच्या भिंती पाडून सहकार्याचे पूल बांधण्याची प्रेरणा देतो.

शेवटी, राष्ट्रीय एकता म्हणजे विचार, संस्कृती आणि मूल्यांचा संगम आहे. ती कोणत्याही एका वर्चस्वावर नव्हे, तर सर्वांच्या सहभागावर आधारित आहे. समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेंसर यांच्या मते, समाज एक जीवंत शरीर आहे, त्यातील प्रत्येक घटकाने आपले कार्य समन्वयाने पार पाडले, तरच ते शरीर निरोगी राहते. भारताचे हे सामाजिक शरीर तेव्हाच सशक्त राहील, जेव्हा आपण धर्म, जात, भाषा, प्रांत यापलीकडे जाऊन एक भारतीय म्हणून विचार करू.

राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने आपल्याला केवळ सरदार पटेलांच्या कार्याचे स्मरण करायचे नाही, तर त्यांच्या एकात्मतेच्या विचारांचा वारसा कृतीत उतरवायचा आहे. आज भारताला गरज आहे ती केवळ विकासाची नव्हे, तर मूल्याधारित एकतेची. समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान राखत, असमानता दूर करत आणि संविधानातील मूल्यांचे पालन करत आपण खऱ्या अर्थाने एकात्म राष्ट्र घडवू शकतो. कारण राष्ट्रनिर्मिती हा एक दिवसाचा उत्सव नसून सातत्याने चालणारी सामाजिक प्रक्रिया आहे आणि त्याचे केंद्रबिंदू आहे राष्ट्रीय एकता.


**- डॉ. राजेंद्र बगाटे, (समाजशास्त्राचे अभ्यासक)**

# लोहपुरुष देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती...

लोहपुरुष देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती ३१ ऑक्टोबर रोजी आहे. स्वातंत्र्यापूर्वी १७ प्रांत आणि ५६५ संस्थानांमध्ये विखुरलेल्या देशाला एका सुत्रात बांधण्याचे आव्हान त्यांनी यशस्वीरित्या पेलले होते. त्यामुळे त्यांची जयंती एकता दिवस म्हणून आपण साजरी करतो.... राष्ट्राचे पहिले गृहमंत्री आणि ज्यांना आपण लोहपुरुष नावाने ओळखतो ते सरदार वल्लभभाई पटेल यांचे कार्य आज नेमकेपणाने नव्या पिढीपर्यंत जायलाच हवे. नव्या समाज माध्यमांत रिलच्या गुंत्यात अडकलेल्या या पिढीला एकता आणि एकात्मता याचाही अर्थ यानिमित्ताने कळेल. आज आपण भाषावार प्रांत रचनेनुसार तयार झालेल्या राज्यांचे नागरिक आहोत आणि या राज्यांचा संघ म्हणजे आपला संघराज्य भारत देश होय. या विस्तीर्ण आसेतू हिमाचल भूमीवर १५० हून अधिक वर्षे कालावधीत ब्रिटिशांनी राज्य केले.

त्यांनी त्या काळात देशात एकता नाही याची प्रथम माहिती झाल्यावर आपल्या सैन्याच्या ताकदीवर मोठी संस्थाने काबीज केली आणि इतरांवर त्याचा प्रभाव पडून अनेक संस्थानांनी ब्रिटीश राज स्वीकारले.

त्याही काळात ज्यांनी ब्रिटिशांना जुमानले नाही अशा संस्थानांमध्ये ऊर्ळींळवश ठीश्रश अर्थात समाजात दुही निर्माण करून गृहकलह घडवायचा आणि संस्थानावर ताबा मिळवायचा अशी निती सुरू केली आणि खरोखरच एकता नसल्यामुळे त्याकाळी ब्रिटीशांना यश मिळत गेले व आपल्या साम्राज्याची पकड मजबूत करण्यात यश मिळाले. भारताची 'सोनेकी चिडिया' अशी ओळख होती. मात्र याला ब्रिटिशांनी आपल्या संपन्नतेसाठी वापरले. इथे असणाऱ्या साधन - संसाधनांचा वापर त्यांनी सत्ता मजबूत करण्यासाठी आणि स्वत: संपन्न होण्यासाठी केला. भारतभूमी म्हणून भारताचे त्याकाळी अस्तित्व संघराज्य म्हणून नव्हते तर त्याकाळी देशात अनेक राजे आणि त्यांची संस्थाने अशी स्थिती होती. देश कृषी संपन् आणि ग्रामीण जीवनात अधिक होता. कारखानदारी जवळपास नव्हती गावागावात बलुतेदारी असणारा तो काळ असल्याने गावातली गावकी आणि माणसं जपणारी गावं असं ग्रामीण भारताचं स्वरुप होतं. भारत विभिन्न भाषा आणि संस्थानांमध्ये विखुरलेला असला तरी स्वातंत्र्यासाठी १८५७ च्या मंगल पांडे च्या उठावानंतर एकवटला गेला आणि देशात स्वातंत्र्याचा मोठा लढा सुरू झाला. ब्रिटिशांना याची दखल घ्यावी लागली आणि कधी सुर्यास्त न होणाऱ्या राणीच्या साम्राज्याचा सूर्यास्त होणार हे नक्की झाले. त्याही वेळी ब्रिटिशांनी फोडा आणि राज्य करा तंत्रावर जोर दिला मात्र दुसऱ्या महायुध्दाने प्रचंड नुकसान झाल्याने ब्रिटिशांना दुसरा पर्याय राहिला नव्हता.



यानंतरच्या काळात राष्ट्रभावनेने देशात सर्व ठिकाणी ब्रिटिशांविरूध्द चळवळ उभी राहीली. नंतरच्या काळात आधी लोकमान्य टिळक आणि त्यानंतर महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली देशात एकसंघ होण्याची तयारी सुरू झाली होती. दर दहा कोसावर बदलणारी भाषा आणि काश्मीर ते कन्याकुमारी अशा आसेतु हिमाचल असणाऱ्या आपल्या देशात १२१ प्रकारच्या भाषा आणि सोबतच २७० मातृभाषा अशी विविधता असल्याने संभाषण ते समन्वय असा प्रवास अवघड असताना देशात स्वातंत्र्याच्या ओढीने एकात्मकतेची सुरूवात झाली होती. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात ब्रिटिशांना कळून चुकले की भारताला आता स्वातंत्र्य द्यावेच लागणार आहे. त्यावेळी देखील त्यांनी धूर्तपणे खेळी खेळण्याचा प्रयत्न केला आणि देशाची फाळणी करतानाच सर्व संस्थानिकांना देशासोबत रहायचे की नाही याचा निर्णय संस्थानिकांनी घ्यावा असे सांगत गोंधळाची परिस्थिती निर्माण केली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्याची पहाट उजाडली त्यावेळी थेट ब्रिटिशांच्या ताब्यात असणारे १७ प्रांत आणि ५६५ संस्थानांमध्ये भारत विखूरलेला होता. यापैकी ३ वगळता सर्व संस्थानांनी भारतात सामील होण्याची मान्यता दिली.

केंद्रात त्यावेळी गृहमंत्री असणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या समोर उर्वरित ३ संस्थानांबाबत निर्णय घेण्याचे आव्हान होते. यात पाकिस्तानच्या सिमेलगत असणारे काश्मीर तसेच जुनागढ आणि हैदराबाद संस्थान यांचा समावेश होता. काश्मीर ताब्यात घेण्यासाठी पाकिस्तानने स्वातंत्र्य मिळताच प्रयत्न सुरू केले. यात मुस्लीमबहूल राज्य आणि हिंदू राजा अशी स्थिती असल्याने हा भाग आपण सहज मिळवू अशी पाकिस्तानची स्वप्ने होती. ज्यावेळी पाकिस्तानी टोळ्यांनी काश्मीरवर ताबा घेण्यासाठी हल्ला केला त्यावेळी राजा हरिसिंह यांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि गृहमंत्री सरदार पटेल यांची मदत घेतली. नुकतेच स्वातंत्र्य मिळालेले असल्याने सैन्य रचना नसतानाही सरदार पटेल यांनी धोरणीपणाने मदत पाठवून पोलिसांच्या मदतीने टोळ्यांचे हल्ले परतविले आणि काश्मीर भारतात राहील याची खात्री केली. मात्र त्यावेळी काही केंद्रीय धोरणे चुकल्याने संपूर्ण स्वायत्तता देणारे कलम ३७० निर्माण करण्यात आले ज्यामुळे नंतरही त्या ठिकाणी हिंसाचार होत राहिला. केंद्रात सत्ता असलेल्या नरेंद्र मोदी यांच्या सरकारने कलम ३७० रद्द करून हा प्रश्न आता कायम सोडवला आहे. इकडे हैदराबाद संस्थानात तेलंगाणा आणि मराठवाड्यासह विदर्भाचा काही भाग होता. हैदराबादच्या निजामाने भारतात येण्यास नकार दिल्याने देशांतर्गत देश असे गंभीर संकट समोर उभे होते. हैदराबाद संस्थानात स्वामी रामानंद तिर्थ यांच्या नेतृत्वात निजामाला विरोध करीत भारतात सामील होण्यासाठी मुक्तीसंग्राम सुरू झाला.

मराठवाडा मुक्तीचा हा लढा मोडून काढण्यासाठी निजामाने भाडोत्री रोहिले-पठाण यांचे सैन्य अर्थात रझाकारांची मदत घेतली. रझाकारांच्या या टोळ्या गावोगावी जाऊन जाळपोळ- हिंसाचार करून मुक्तीसंग्राम मोडून काढण्याचा प्रयत्न करीत होते.

या मुक्तीसंग्रामाची दखल घेत सरदार पटेल यांनी पोलिस कारवाई केली ज्यामुळे निजाम शरण आला व देशाच्या स्वातंत्र्यानंतर १३ महिन्यांनी मराठवाड्यासह हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

त्याच पद्धतीने मग संधीपणाचा व राजकीय परिपक्वतेचा वापर करून सरदार पटेल यांनी जुनागढ संस्थान देखील भारतात विलीन करून घेतले*

सरदार पटेल यांचा कणखरपणा देशाला एकत्र आणण्यात आणि एकता राखण्यासाठी महत्त्वाचा ठरला. नंतरच्या काळात भाषावार राज्यांची निर्मिती झाली. यात एकूण २२ भाषा मंजूर आहेत. बोलीभाषा भिन्न तसेच देशातील एकतेचा दुवा म्हणजे आपल्याकडील सण आणि उत्सव आणि याला एकसंघ करण्याचे काम करणारे सरदार वल्लभभाई पटेल होय. त्यांच्या या निर्णयांमुळे आज देशात एकता आहे आणि ही एकता पुढील काळातही राखावी लागणार हे नक्की.

**( प्रशांत दैठणकर )**
**प्र.उपसंचालक(माहिती),**
**छत्रपती संभाजीनगर**

## संक्षिप्त

### हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची उपकंपनी, मुंबई ) जिल्हा कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता अनुदान योजने अंतर्गत ९ कर्जप्रकरणाचे उद्दिष्ट, बीज भांड्वल योजनेअंतर्गत ९ कर्ज प्रकरणांचे उद्दिष्ट, थेट कर्ज योजने ( थेट कर्ज योजना रु.१ लक्ष पर्यंत ) अंतर्गत४४ कर्जप्रकरणाचे उद्दिष्ट व एनएसएफडीसी योजने अंतर्गत १४ कर्जप्रकरणांचे उद्दिष्ट आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जातीतील हिंदु खाटीक समाजातील गरजूंनी आपला अर्ज आवश्यक कागदपत्रासह नोव्हेंबर २०२५ अखेरपर्यंत जिल्हा कार्यालय छत्रपती संभाजीनगर डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन खोकडपुरा छत्रपती संभाजीनगर येथे करावा.उद्दिष्टापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास अर्जाची संगणकीय रेंडमायझेशन प्रणालीद्वारे अनुदान योजना, बीजभांडवल योजना, थेट कर्ज योजना व एनएसएफडीसी योजने अंतर्गत निवड करण्यात येणार आहे. उर्वरित निवड न झालेले अर्ज रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांसाठी 'कापूस किसान मोबाईल ॲप'

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी भारतीय कपास महामंडळ (उउख) तर्फे 'कापूस किसान मोबाईल प' सुरू करण्यात आले आहे. हे प कापूस हंगामात २४ तास आणि आठवड्याचे सातही दिवस उपलब्ध राहणार असून, शेतकऱ्यांना नोंदणी व स्लॉट बुकिंग प्रक्रियेसाठी मदत करेल.

या पमध्ये नोंदणी, स्लॉट बुकिंग तसेच आवश्यक मार्गदर्शक सूचना सविस्तरपणे दिलेल्या आहेत. प्रक्रियेविषयी अधिक माहिती व मार्गदर्शक व्हिडिओसाठी शेतकऱ्यांनी www.youtube.com/KapasKisan-Official या अधिकृत यूट्यूब लिंकला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**स्लॉट बुकिंग प्रक्रिया :** स्लॉट बुकिंग सुविधा ७ दिवसांच्या रोलिंग बेसिसवर खुली राहणार असून, प्रत्येक दिवशी एक तारीख बंद होईल आणि नवीन तारीख खुली होईल. उद्घाटनाच्या दिवशी सुट्टी राहणार नाही. महाराष्ट्र राज्यातील अकोला आणि छत्रपती संभाजीनगर शाखांसाठी स्लॉट बुकिंगची वेळ दररोज सकाळी १० वाजता सुरू होईल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित चे प्रभारी विभागीय व्यवस्थापक यांनी दिली आहे.

### जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनाई आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी /** आगामी सणांच्या पार्श्वभुमिवर कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी जनार्दन विधाते यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि. १४ नोव्हेंबर पर्यंत हे आदेश अमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी (दि.३१) आयोजीत पदयात्रेत सहभागी व्हा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या








१५० व्या जयंतीनिमित्त भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्यावतीने शुक्रवार दि.३१ रोजी एकता पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेत समाजातील सर्व घटकांनी सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

यानिमित्त दि.३१ ऑक्टोंबर ते २५ नोव्हेंबर या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीस उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवार, जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) आश्विनी लाठकर, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, डॉ, महेश लड्ढा तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

**शुक्रवारी (दि.३१) पदयात्रा**

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शुक्रवार दि.३१ ऑक्टोंबर रोजी पदयात्रा आयोजीत करण्यात आली आहे, ही पदयात्रा सकाळी ७.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयापासुन सुरु होईल. जिल्हाधिकारी कार्यालय ते सरदार वल्लभभाई पटेल पुतळा, शहागंज येथे या पदयात्रेचा समारोप होईल. या रॅलीत सर्व शासकीय कर्मचारी-अधिकारी, राजकीय- सामाजिक कार्यकर्ते, क्रीडा संघटना, सामाजि संघटना यांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

**दि.२५ नोव्हेंबर पर्यंत विविध कार्यक्रम**

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने यानिमित्त विविध कार्यक्रम दि.३१ ऑक्टोंबर ते २५ नोव्हेंबर या कालावधीत आयोजीत करण्यात आले आहेत.

त्यात सव महाविद्यालये व माध्यमिक विद्यालयांमध्ये निबंध, चित्रकला, वादविवाद स्पर्धा घेण्यात येतील. सरदार वल्लभभाई पटेल आणि राष्ट्रनिर्माण याविषयावर आधारीत विविध कार्यक्रम होतील, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

## गंगापुर विधानसभाः मतदार यादीत दुबार नावे असणाऱ्या मतदारांना १५ नोव्हेंबरपर्यंत मुदत-मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सुचिता शिंदे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** जिल्ह्यातील १११ गंगापूर विधानसभा मतदार संघातील दुबार मतदार नोंदणी संदर्भात प्राप्त तक्रारींची यादी ही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व जिल्ह्याचे संकेतस्थळ येथे उपलब्ध आहेत. या याद्या पाहून दुबार नावे असलेल्या मतदारांनी आपले नाव नेमके कोणत्या ठिकाणी ठेवणे अपेक्षित आहे, याबाबत पुरव्यांसह दि.३१ ऑक्टोंबर ते दि.१५ नोव्हेंबर या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून फॉर्म ७ भरुन द्यावा, अन्यथा भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० चे कलम २२ प्रमाणे कारवाई करण्यात येईल,असे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन डॉ. सुचिता शिंदे यांनी कळविले आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर व तहसिल कार्यालय गंगापूर येथे १११ गंगापूर विधानसभा मतदार संघात दुबार मतदार नोंदणी संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.या तक्रारींबाबत चौकशी व कारवाई करण्यासाठी दि.१० रोजी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची बैठक घेण्यात आली व भारतीय लोक प्रतिनिधीत्व अधिनियम १९५० अन्वये कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. मौजे रांजणगाव शेणपुंजी येथे दि.१३ ते १५ या कालावधीत दुबार मतदारांची पडताळणी व नाव वगळणी याबाबत फॉर्म क्रमांक ७ भरण्यासंदर्भात विशेष शिबीर आयोजीत करण्यात आले. या शिबिरात १५१ मतदारांचे नाव वगळण्यासंदर्भात फॉर्म क्रमांक ७ भरण्यात आले. अन्य मतदारांबाबतही मतदान केंद्र अधिकारी यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे. जिल्हाधिकारी यांनी सुद्धा यासंदर्भात बैठक घेऊन पडताळणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सुचिता शिंदे यांनी या दुबार मतदारांच्या याद्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना उपलब्ध करुन दिल्या असून जे मतदार दिलेल्या पत्त्यावर आढळून आले नाहीत त्याबाबत पंचनामा करावा, असे निर्देश दिले आहेत. तरी गंगापूर विधानसभा मतदार संघातील सर्व मतदारांनी प्राप्त दुबार मतदारांची यादी , तक्रारी जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे संकेतस्थळ www.chhatrapati-sambhajianagar.maharashtra.gov.in येथे प्रसिद्ध केली आहे.

तसेच याच याद्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे सुद्धा देण्यात आल्या आहेत. मतदारांनी या याद्यांचे अवलोकन करावे. आपले नाव त्यात दुबार असल्यास ते नेमक्या कोणत्या ठिकाणी ठेवणे अपेक्षित आहे याबाबत आवश्यक पुराव्यांसह मतदान केंद्र अधिकारी यांच्याकडे दि.३१ ऑक्टोंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत संपर्क साधावा व जेथून नाव वगळावयाचे आहे तेथे फॉर्म नं.७ भरुन संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे द्यावा.

अन्यथा भारतीय लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे कारवाई करण्यात येईल,असे मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सुचिता शिंदे यांनी कळविले आहे.

## सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेत कंत्राटी पद्धतीने पदभरती

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी /** सैनिकी सेवा-पूर्व शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर येथे विविध अशासकीय पदांवर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने भरती करण्यात येणार आहे,असे सैनिक सेवापूव प्रशिक्षण संस्थेचे संचालक निवृत्त कर्मल मकरंद देशमुख यांनी कळविले आहे.

या भरतीत भरावयाची पदे सुतार, शिपाई, ग्राऊंडमॅन, मसालची, सफाईगार, वाहनचालक, डिटीपी ऑपरेटर, व सहायक लिपिक या पदासाठी भरती होणारी पदसंख्या प्रत्येकी एक (१) आहे. सुतार, शिपाई, ग्राऊंडस्मॅन, मसालची, सफाईगार, वाहन चालक यापदांसाठीचे उमेदवार इयत्ता १० वी उत्तीर्ण असावे. तसेच माजी सैनिक व इतर नागरिक अर्ज करू शकतात. वाहनचालक पदासाठी कार्यालयीन कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य दिले जाणार आहे. तर डीटीपी ऑपरेटर या पदासाठी इयत्ता १२ वी पास उमेदवार व मराठी , इंग्रजी भाषेचे टायपिंग ज्ञान आवश्यक आहे. सहायक लिपिक पदासाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर ही पात्रता असून संगणक हाताळणीचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य राहील. इच्छुक व पात्र उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह दि. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, एन-१२, सेक्टर-सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे संचालक कर्नल (निवृत्त) मकरंद देशमुख यांनी केले आहे. संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक - ९७६७१५०४७७/९४२३२५३६६८.

## अतिवृष्टीचे पिक विम्याची रक्कम तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करा - भाऊसाहेब गवळी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/ सुभान शहा/** भेंडाळा जामगाव मंडळसह संपूर्ण गंगापूर तालुक्यातील शेती पिकाचे १००% नुकसान झालेले आहे तरी अतिवृष्टीची पिक विम्याचे अनुदान व घराची पडझड पैसे तात्काळ शेतकऱ्याच्या लाभात्याच्या खात्यात टाका अतिवृष्टीमुळे गंगापूर तालुक्यातील शेतकरी खूप अडचणीत सापडलेला आहे शासनाने दिवाळीपूर्वीच मदत दिली जाईल.



अशी घोषणा केली होती परंतु कालची एक प्रकारे दिवाळी अंधारात साजरी करायला भाग पाडले शासनाने फक्त घोषणाचा पाऊस पडला पण प्रत्यक्षात मदत शेतकऱ्याच्या खात्यावर तत्काळ नुकसान भरपाईचे पिक विम्याचे व घराची पडझडीचे पैसे तातकाळ टाकावे नसता कायगाव गोदावरी नदीमध्ये सामूहिक जलसमाधी करण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील असे पत्र गंगापूर तहसीलदार नवनाथ वगवाड यांना दिले त्यावेळी भाऊसाहेब गवळी कायगावकर बापूसाहेब गायकवाड निलेश काने भागचंद नजन गणेश गायकवाड किशोर गायकवाड ज्ञानेश्वर चंद्रभान गायकवाड नंदकिशोर बागल बाळासाहेब गायकवाड अण्णासाहेब पिके गणेश मिसाळ बद्रीनाथ मिसाळ गोकुळ दापटे आदी शेतकरी हजर होते.

# आमदार जाधवांच्या वक्तव्यामुळे संभाव्य उमेदवारांचा हिरमोड...



**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड प्रतिनिधी/उदय कुलकर्णी./** कन्नड शहरातील गजानन हेरिटेज कार्यालयात दीपावली निमित्य आयोजीत केलेल्या स्नेहमीलन कार्यक्रमात आ.संजनाताई जाधवांनी केलेल्या भाषणामुळे अनेक संभाव्य उमेदवारत नाराजीचे सुर उमटले असुन त्यांचा संपूर्णतः हिरमोड झालाचे दिसून आले.

या आयोजीत स्नेहमीलन कार्यक्रमासाठी तालूका भरातून होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी पक्षाचे वतीने काही अशादायक विचार व मार्गदर्शन ऐकावयास मिळेल आशा उद्देशाने अनेक संभाव्य पं.स.जि.प.नगरसेवक तसेच नगराध्यक्ष पदाचे दावेदार संभाव्य उमेदवार या कार्यक्रमास आले होते.पण आ.संजनाताईंनी केलेल्या भाषणात त्यांना भरारी देणे ऐवजी उलट त्यांना उद्देशून असे विधान केले गेले की,घरी बसून सोशल मीडियावर आपले फ़ोटो व्हायलर करून उमेदवारी मिळत नसते. तर त्यासाठी रस्त्यावर उतरून प्रत्येक नागरिकांची मणे जिंकावी लागतात.असे स्पष्ट केले. त्यांच्या या विधानाने भावी म्हणून घेणाऱ्या पं.समिती,जि.प.सदस्य तथा भावी नगरसेवक तथा नागराध्यक्ष संभाव्य उमेदवारांना मोठा धक्का बसल्याचे दिसून आले.सदरचा कार्यक्रम पार पडताच सर्वत्र नाराजीचे वातावरण पहावयास मिळाले. त्यातच तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसान व त्या बाबत शासनाकडुन मिळणाऱ्या नुकसान भरपाई बाबतच्या प्रश्नावर या स्नेहमीलन कार्यक्रमात आमदार,महोद्यांकडून

चकार शब्दही न निघाल्यामुळे शेतकरी वर्गातही मोठे नाराजीचे सावट पसरल्याचे दिसून आले.त्यामुळे अनेक शेतकरी वर्गाने या कार्यक्रमाकडे पाठ फिरवल्याचेही दिसून आले.कार्यक्रम संपताच कार्यक्रमाचे चर्चे एवजी आमदार संजना जाधवांच्या व्यक्तव्यचिच सर्वत्र चर्चा रंगल्याचे दिसून आले.त्यामुळे संभाव्य उमेदवार,नाराज कार्यकर्ते व नुकसान भरपाई पासून वंचित शेतकरी वर्गाची नाराजी इतक्यातच काय

हा कार्यक्रम विखुरला गेल्याचे दिसून आले.या कार्यक्रमास खासदार संदीपान भुंबरे,वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे,जिल्हा प्रमुख भरत राजपूत यांची उपस्थिती होती.



## मराठवाडा पदवीधर नोंदणी अभियान संपर्क कार्यालयाचे उद्घाटन संजय खंबायते यांच्या हस्ते

**आत्ताच एक्सप्रेस**


**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा/** मराठवाडा पदवीधर नोंदणी अभियान संपर्क कार्यालयाचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले वाळुज येथे मोठ्या प्रमाणात पदवीधरांची नोंदणी करण्याच्या दृष्टीने आज भारतीय जनता पार्टीच्या वतीने मराठवाडा पदवीधर नोंदणी अभियान संपर्क आल्याचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी रिबीन कापून केले त्यावेळी भाजपा जिल्हा महामंत्रीसौ ज्योतिताई गायकवाड, ओबीसी मोर्चा सरचिटणीस धोंडीराम होले पाटील, तालुका सरचिटणीस सचिन मुंडे, उपाध्यक्ष जनार्धन चनघटे बाबासाहेब शिंदे पाटील, नामदेव इले पाटील, शहराध्यक्ष रवी मनगटे ,शिक्षक आघाडीचे ता संयोजक चेतन बोरोले,धीरज साकला, योगेश नाडे आदि मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी सुमारे ४५ पदेधारांचे फॉर्म भरून घेण्यात आले तसेच परिसरातील नागरिकांसाठी घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी व लाभार्थ्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री अविनाश गायकवाड यांनी मानले. त्यावेळेस सर्व कार्यकर्त्यांनी २००० सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा संकल्प केला.

## मंठा तालुक्यात शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचे काम सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतुर/प्रतिनिधी/** जिल्ह्यात मंठा तालुक्यातील माहे जुलै व माहे सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले होते.

त्या अनुषंगाने शेतपिकाच्या नुकसानाचे पंचनामे करण्यात आले व मंठा तालुक्यातील माहे जुलै महिन्यातील शेती पिक नुकसान अनुदान वाटप करिता दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार याद्या अपलोड करण्यात आल्या आहेत. माहे जुलै महिन्यातील शेतीपिकांच्या नुकसानीसाठी



मंठा तालुक्यासाठी रु. ७,००,४१,३८५/- (सात कोटी एकेचाळीस हजार तिनशे पंच्याऐंशी रुपये) प्राप्त झालेले आहेत. तसेच माहे स्पटेंबर मधील नुकसान अनुदान वाटपासाठी दि.२०/१०/२०२५ व २९/१०/२०२५ शासन निर्णयाद्वारे उपलब्ध झाले असुन माहे स्पटेबर २०२५ मधील नुकसानग्रस्त शेतकरी याद्या अपलोड करण्याची प्रक्रीया युध्द पातळीवर सुरु आहे. माहे सप्टेंबरच्या सततच्या पाऊसामुळे मंठा तालुक्यातील एकुण रु. ३९,८४,८३,०९०/- (एकोनचाळीस कोटी चौऱ्याऐंशी लक्ष त्र्याऐंशी हजार नव्वद रुपये) अनुदान लवकरच सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचे काम सुरु आहे, अशी माहिती तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

**ई-निविदा सुचना**
**मुख्यमंत्री ग्राम सडक योजना,**
**महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर**
**ई-निवीदा सुचना क्र. ०२/२०२५-२६**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ADB) अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मंजूर एकूण १ पॅकेज ( एकूण १ पुलाचे काम) ची ई-निविदा दिनांक. ३१/१०/२०२५ रोजी सकाळी अनुक्रमे १०.०० वाजेनंतर https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**निविदा सादर करण्याचा अंतिम दि. ०७/११/२०२५ रोजी अनुक्रमे १७.३० वाजेपर्यंत आहे.**

**(स्वाक्षरीत /-)**
**(पी.जी. खडेकर)**
**कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो),**
**म.ग्रा.र. वि.सं. छत्रपती संभाजीनगर**

**(स्वाक्षरीत /-)**
**विनोद भदाने**
**अधीक्षक अभियंता (प्रमंग्रासयो), म.ग्रा.र.वि.सं., छत्रपती संभाजीनगर विभाग,**

आरओसी-२०२५-२६/क्र-५/C3621

## संक्षिप्त

### पोस्टाच्या डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये पीएलआय, आरपीएलआय मध्ये डिजिटल व्यवहारांचा प्रसार व मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अद्ययावत करण्यासाठी विशेष मोहीम डाक विभागाच्यावतीने वर्ष २०२५ च्या अखेरपर्यंत पोस्टल लाईफ इन्शुरन्स आणि ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स (ठझडख) मध्ये डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबवली जात आहे. तरी सर्व विमाधारकांनी आपल्या जवळच्या टपाल कार्यालयात भेट देऊन संपर्क माहिती अद्ययावत करून डिजिटल व्यवहारांची सुविधा घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. पोस्टाच्या डिजीटल व्यवहार विशेष जनजागृती मोहीम उपक्रमाचा उद्देश ग्राहकांना सुलभ सेवा प्रदान करणे व व्यवहारांमध्ये पारदर्शकता ठेवणे आहे. ग्राहकांना त्यांच्या पीएलआय, आरपीएलआय खात्यांमध्ये मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अद्ययावत करण्याचे आवाहन करण्यात येत आहे, जेणेकरून हप्त्याची माहिती, पावत्या व इतर महत्वाच्या सूचना वेळेवर प्राप्त होऊ शकतील. डाक कर्मचारी ग्राहकांना संपर्क माहिती अद्ययावत करण्यात मदत करत आहेत तसेच डिजिटल पेमेंट करण्याबाबत मार्गदर्शनही करत आहेत. हा उपक्रम ग्राहक समाधानी सेवा व डिजिटल पोहोच वाढवण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. असेही कळविले आहे.

### अल्पसंख्यांक समुदायातील शाळा, महाविद्यालयांनी पायाभूत सोयी-सुविधा मिळण्यासाठी अनुदान योजनेचा लाभ घ्यावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णयान्वये राज्यातील धार्मीक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यास शासन मंजूरी देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडील परिपत्रकान्वये सन २०२५-२६ या वर्षासाठी सदर योजना राबविण्यात येणार असल्याने अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या अल्पसंख्यांक बहुल शासन मान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळा यांची शिफारस करण्याचे निर्देश दिले आहे. यास अनुसरुन शासन निर्णय दि. ०७.१०.२०१५ मधील कार्यपध्दतीचा अवलंब करुन तसेच अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या शाळांनी,संस्थांनी अर्जासोबत शासन निर्णयांमध्ये नमूद केल्याप्रमाणे कागदपत्राच्या साक्षांकित प्रती जोडून परिपुर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना या कार्यालयात दाखल करण्याचा अंतिम दि. १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आहे, याची नोंद घ्यावी. विहीत मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. सदर योजनेच्या शासन निर्णयासोबतच्या अर्जाचा नमुना (https://jalna.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### शेतकऱ्यांसाठी भारतीय कपास महामंडळाने कापूस किसान मोबाईल ॲप केले विकसीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ भारतीय कपास महामंडळ, नवी मुंबई सार्वजनिक सुचना सर्व मान्यवर कापूस उत्पादक शेतकऱ्याना कळविण्यात येते की, भारतीय कपास महामंडळाने कापूस किसान मोबाईल ॲप नावाचे मोबाईल अप्लिकेशन सुरू केले आहे. जे कापूस हंगामात २४ तास व ७ दिवस उपलब्ध असेल. कापूस किसान मोबाईल ॲपद्वारे नोंदणी व स्लॉट बुकिंग प्रक्रियेस मदत करण्यासाठी एक विशेष लिंक तयार करण्यात आली आहे. ज्या ॲपमध्ये नोंदणी व स्लॉट बुकिंगसाठी सविस्तर माहिती व पायऱ्या दिलेल्या आहेत. शेतकऱ्यांना विनंती आहे की खालील लिंकवर क्लिक करून स्थानिक भाषेत तयार केलेली माहिती व व्हिडिओ पहावे. https://www.youtube.com/KapasKisan-Official स्लॉट बुकिंग सुविधा सात दिवसाच्या रोलिंग बेसिसवर खुली राहील. प्रत्येक दिवशी एक तारीख बंद होईल व दुसऱ्या दिवशी नवीन तारीख खुली केली जाईल. उद्घाटनाच्या दिवशी सुट्टी नसेल, महाराष्ट्र राज्याकरिता स्लॉट बुकिंगची वेळ औरंगाबाद शाखा दररोज सकाळी १० वाजता होईल. असेही विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादीत, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालयाकडून जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय जालना अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या माध्यमातून अंबड येथे बालविवाह, बालकांच्या अधिकाराबाबत जनजागृती कार्यशाळा शंभर दिवस जनजागृती कार्यक्रमांतर्गत अंबड येथे जिल्हा बाल सर्कल कक्षामार्फत जनजागृती कार्यक्रम जिल्हा महिला बाल विकास अधिकारी श्री कड यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री. नागरे हे होते. जनजागृतीपर कार्यक्रमाला अंबड तालुक्यातील २५० कार्यकर्त्या उपस्थित होत्या . यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना बाल विवाह कामकाज कायदा, बालकांचे अधिकार, बेटी बचाओ बेटी पढाओ, १०९८, गाव बाल संरक्षण समिती गावात बालविवाह होणार नाही याबाबत घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख प्रशिक्षक म्हणून जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन इंगळे, सचिन चव्हाण, संरक्षण अधिकारी नितिन जराड, मिनाक्षी शिंदे यांची उपस्थिती होती सदर कार्यक्रम घेण्यात आला.

## शेतकऱ्यांना सन २०२४ चे अतिवृष्टी अनुदान मिळावे- वाडेकर

### कृषी, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या कडे निवेदनाद्वारे मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी प्रतिनिधी** / घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले असून, शासनाने जाहीर केलेले अतिवृष्टी अनुदान अद्याप अनेक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेले नाही. या पार्श्वभूमीवर शिव उद्योग सहकार सेना प्रदेशाध्यक्ष रामेश्वर वाडेकर यांनी कृषी, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांना तातडीने थकबाकी अनुदान देण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, घनसावंगी तालुक्यातील अनेक गावांमध्ये २०२४ च्या पावसाळ्यात अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कपाशी, तूर, मका, भाजीपाला यासह विविध पिकांचे मोठे नुकसान झाले. शासनाने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची घोषणा केली होती, मात्र प्रत्यक्षात हजारो शेतकरी अजूनही या मदतीपासून वंचित आहेत. काही भागांतील शेतकऱ्यांना अनुदान मिळाले असले, तरी बहुतांश गावांतील शेतकरी अद्याप प्रतीक्षेत आहेत. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे , शेतकऱ्यांनी तहसिलदार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात अनेक वेळा निवेदने सादर केली, परंतु ठोस निर्णय घेतला गेलेला नाही. प्रशासनाचे म्हणणे आहे की, अतिवृष्टी अनुदानातील ८० कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचा तपास सुरू असून, संबंधित कर्मचाऱ्यांकडून पैसे वसूल करून शेतकऱ्यांना देण्यात येतील. मात्र या प्रक्रियेला किती वेळ लागेल हे स्पष्ट नाही. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना थकबाकी अनुदान वितरित करावे, अशी मागणी त्यांनी केली.

शिवसेनेतर्फे सादर करण्यात आलेल्या या निवेदनाची दखल घेऊन शेतकऱ्यांच्या



अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या मागणीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये थोडी आशा निर्माण झाली असून, शासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

## डॉ. झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजनेसाठी अर्ज करावेत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णयान्वये मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपरिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिन्दी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ. ९ वी, १० वी, ११ वी व १२ वीतील तसेच औद्योगिक शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृती देणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ होऊन त्यांची रोजगार क्षमता वाढून आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होईल या दृष्टीने मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालयासाठी अनुदान देणे व शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देणे यादृष्टीने डॉ. झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यास शासन मंजूरी देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग यांचे परिपत्रकान्वये सन २०२५-२६ या वर्षासाठी सदर योजना राबविण्यात येणार असल्याने पात्र मदरशांची शिफारस करण्याचे निर्देश दिले आहे.

शासन निर्णयातील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या मदरशांनी अर्जासोबत शासन निर्णयांमध्ये नमूद कागदपत्राच्या साक्षांकित प्रती जोडून परिपुर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना या कार्यालयात दाखल करण्याचा अंतिम दि. १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आहे, याची नोंद घ्यावी.

विहीत मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. सदर योजनेच्या शासन निर्णयासोबतच्या अर्जाचा नमुना (https://jalna.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## मंठा तालुक्यात शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचे काम सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जिल्ह्यात मंठा तालुक्यातील माहे जुलै व माहे सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले होते. त्या अनुषंगाने शेतपिकाच्या नुकसानाचे पंचनामे करण्यात आले व मंठा तालुक्यातील माहे .

जुलै महिन्यातील शेती पिक नुकसान अनुदान वाटप करिता दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार याद्या अपलोड करण्यात आल्या आहेत. माहे जुलै महिन्यातील शेतीपिकांच्या नुकसानीसाठी मंठा तालुक्यासाठी रु. ७,००,४१,३८५/- (सात कोटी एकेचाळीस हजार तिनशे पंच्याऐंशी रुपये) प्राप्त झालेले आहेत. तसेच माहे स्पटेंबर मधील नुकसान अनुदान वाटपासाठी दि.२०/१०/२०२५ व २९/१०/२०२५ शासन निर्णयाद्वारे उपलब्ध झाले असुन माहे स्पटेबर २०२५ मधील नुकसानग्रस्त शेतकरी याद्या अपलोड करण्याची प्रक्रीया युध्द पातळीवर सुरु आहे. माहे सप्टेंबरच्या सततच्या पाऊसामुळे मंठा तालुक्यातील एकुण रु. ३९,८४,८३,०९०/- (एकोनचाळीस कोटी चौऱ्याऐंशी लक्ष त्र्याऐंशी हजार नव्वद रुपये) अनुदान लवकरच सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचे काम सुरु आहे, अशी माहिती तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## आपदा मित्र प्रशिक्षणासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ आपत्ती व्यवस्थापनामध्ये आपदा मित्र (आपत्कालीन परिस्थितीत मदत करणारा स्वयंसेवक) म्हणून स्वेच्छेने प्रशिक्षण घेण्यास इच्छूक असलेल्या व्यक्तीने आपत्ती व्यवस्थापन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना अथवा आपल्या नजीकच्या तहसील कार्यालय येथे नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

राज्यातील २० जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या आपदा मित्र या योजनेचे यश विचारात घेऊन उर्वरित १६ जिल्ह्यात 'आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम' राबविण्यास शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत जालना जिल्ह्यामधून एकूण ३०० आपदा मित्रांना (स्वंयसेवक) आपत्ती व्यवस्थापन विषयाबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

आपदा मित्रांत नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थीनी, एनसीसी/ एनएसएस विद्यार्थी, अशासकीय संस्था, आशा, पोलिस पाटील, कोतवाल, अंगणवाडी सेविका, होमगार्ड, पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा बल, खाजगी सुरक्षा रक्षक, शासकीय/निम शासकीय कर्मचारी यांचा समावेश करण्यात येणार आहे. सहभागी होणाऱ्या प्रशिक्षणार्थीना १२ दिवसाचे निवासी प्रशिक्षण, वैयक्तिक आपत्कालीन प्रतिसादकर्ता संच, ३ वर्षासाठी ५ लाखाचे विमा संरक्षण राज्य शासनातर्फे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सदरील कीट आपदा मित्र प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर जिल्ह्यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

आपदा मित्र निवडीसाठी सदर व्यक्ती ही भारताची नागरिक असावी व संबंधित जिल्ह्यातील रहिवासी असावी. सदर व्यक्ती हि शारिरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावी. वय-१८ ते ४५ वर्ष (माजी सैनिक, डॉक्टर, स्थापत्य अभियंता, शास्त्रज्ञ, आपत्कालीन सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी करून घेता येईल त्याकरिता वयोमर्यादा ५५ वर्षे असेल मात्र त्यांना विमा सुरक्षा देता येणार नाही.) आपदा मित्र प्रशिक्षणामध्ये किमान ३५ टक्के महिलांचा सहभाग असणे आवश्यक आहे. याप्रमाणे निकष ठरविण्यात आले आहेत.

## राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना ८ हजार कोटी रुपये वितरित: अतिरिक्त ११ हजार कोटी रुपयांच्या मदत पॅकेजला मंत्रिमंडळाची मंजुरी

***जालना जिल्ह्यातील ५५ हजार ८९० शेतकऱ्यांसाठी ३५६.६६ कोटी मंजूर: ३ लाख ८० हजार २६ हेक्टर क्षेत्राचा समावेश**

***महाराष्ट्रातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक मदत - आमदार बबनराव लोणीकर**

***अग्रीस्टॅक खाते नसलेल्या शेतकऱ्यांनी ई-केवायसी, आधार सह बँक खाते लिंकिंग करण्याचे आमदार बबनराव लोणीकर यांचे आवाहन**

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी प्रतिनिधी / आंगद मुंढे**/ महाराष्ट्र शासनाने सप्टेंबर महिन्यात राज्याच्या विविध भागांत झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे शेती क्षेत्राला मोठ्या प्रमाणात झालेल्या नुकसानीची दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर (भाग-१८ / म-०३) दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ नुसार पहिल्या टप्प्यात ० ते २ हेक्टर क्षेत्र असलेल्या लहान शेतकऱ्यांसाठी ११ हजार १३९ कोटी ९६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

या टप्प्यात राज्यातील ९२ हजार २७९ शेतकरी त्याहून जास्त नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी असिंचित जमिनीवर १८ हजार रुपये प्रति हेक्टर, हंगामी बागायती जमिनीवर २७ हजार रुपये प्रति हेक्टर आणि सिंचित जमिनीवर ऊस किंवा भाजीपाला पिकांसाठी ३२ हजार रुपये प्रति हेक्टर अनुदान मिळेल.






मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रीमंडळाच्या बैठकीत २८ ऑक्टोबर २०२५ रोजी अतिरिक्त ११ हजार कोटी रुपयांच्या मदत पॅकेजला मंजुरी देण्यात आली.

यापूर्वी शासनाने ८ हजार कोटी रुपये वितरित केले असून आता एकूण १९ हजार कोटी रुपयांचा निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केला जाणार आहे. ही मदत राज्य आपत्ती प्रतिसाद निधी आणि केंद्र सरकारच्या सहाय्याने उपलब्ध करून दिली जाणार आहे.*

शासन निर्णय क्रमांक सीए-लएस-२०२५ / प्र.क्र.२३५ आणि ९ लाख ८७ हजार ९१ हेक्टर क्षेत्र समाविष्ट आहे. या टप्प्यातील वितरण प्रक्रिया २९ ऑक्टोबरपासून सुरू झाली असून पुढील १५ दिवसांत म्हणजे १२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होईल. जालना जिल्ह्यासाठी विशेष निधी मंजूर करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ५५ हजार ८९० शेतकऱ्यांसाठी ३५६ कोटी ६६ लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

यात ३ लाख ८० हजार २६ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. नुकसानाच्या प्रमाणानुसार अनुदानाचे दर ठरविण्यात आले आहेत. ५० टक्के किंवा

याशिवाय रबी हंगामासाठी बियाणे आणि खते खरेदी करण्यासाठी १० हजार रुपये प्रति हेक्टर अतिरिक्त मदत दिली जाईल. माती सुपीकता नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ४७ हजार रुपये रोख आणि मनरेगा अंतर्गत ३ लाख रुपये मजुरी स्वरूपात माती पुनर्स्थापनेसाठी मिळतील.

एका शेतकऱ्याला कमाल ३ हेक्टरपर्यंतच अनुदान मिळेल. वितरण प्रक्रिया थेट बँक हस्तांतरण पद्धतीने होईल. ० ते २ हेक्टर क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात २९ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पैसे जमा होतील. २ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांसाठी ५ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत वितरण होईल. ई-केवायसी, आधार आणि बँक खाते लिंकिंग पूर्ण नसल्यास पैसे अडकू शकतात. अशा शेतकऱ्यांनी तात्काळ तहसील कार्यालय किंवा आपले सरकार केंद्रात संपर्क साधावा असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.

भाजपा नेते, माजी मंत्री परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले की ही मदत शेतकऱ्यांना रबी हंगाम उभा करण्यासाठी आणि शेती पुनर्स्थापित करण्यासाठी उपयुक्त ठरेल. पिक विमा असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त लाभ मिळेल. वितरण प्रक्रिया पारदर्शक आणि जलद व्हावी अशी अपेक्षा देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले की शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे आणि रबी हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल.

जालना जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी, पूरपरिस्थिती, वादळवारे आणि सतत धार पावसामुळे जालना जिल्ह्यातील मंठा व परतूर तालुक्यातील गावागावातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रशासनासह झालेल्या नुकसानीची पाहणी केली होती.

याबाबतीत जिल्हाधिकारी कार्यालय जालना, तहसील कार्यालय परतुर व तहसील कार्यालय मंठा या ठिकाणी तातडीने आढावा बैठकी घेऊन अतिशय तातडीने पंचनामे सादर करून जालना जिल्ह्याचा झालेल्या नुकसानीचा अहवाल शासनास तातडीने सादर करण्याकरिता आमदार बबनराव लोणीकर यांनी विशेष प्रयत्न केले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813